संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई यांच्या आस्थापनेवरील सहाय्यक व्यवस्थापक (गट-ब) या पदावरील नियुक्ती.

श्री. धीरज शेषराव नागदेवे

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन आदेश क्र.:-मलोआ-२०२३/प्र.क्र.१११/उद्योग-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ मार्च, २०२४.

वाचा:- उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे पत्र क्र.आयएलआर २१२१/प्र.क्र.५०/२०२१/अठ्ठावीस, दि.०३.०७.२०२३.

शासन आदेश

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संदर्भाधीन पत्रान्वये शिफारस केल्यानुसार श्री.धीरज शेषराव नागदेवे यांची (अनुसूचित जाती) यांची सहाय्यक व्यवस्थापक (सामान्य राज्यसेवा गट-ब, राजपत्रित) वेतनश्रेणी (एस-१६: ४४९००-१४२४००) व नियमानुसार त्यावर प्राप्त होणारा महागाई भत्ता व इतर भत्ते या वेतनश्रेणीतील या नेमणूक करुन त्यांची पदस्थापना सहायक व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई या पदावर करण्यात येत आहे. तसेच श्री.नागदेवे यांना उप व्यवस्थापक, मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात येत आहे.

१) श्री.धीरज नागदेवे यांनी सदरचे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनायल, मुंबई यांच्याकडे रुजू व्हावे व सहायक व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई या पदाचा पदभार स्विकारावा अन्यथा त्यांची नेमणूक रद्द करण्यात येईल. तसेच संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनायल, मुंबई यांनी श्री.धीरज नागदेवे यांना रुजू करुन घेतल्यानंतर व पदस्थापना स्विकारल्यानंतर त्याबाबतचे आदेश निर्गमित करावेत. जर ते विहित कालावधीत सदर पदावर रुजू झाले नाहीत तर तसा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी शासनास सादर करावा.

२) श्री.धीरज नागदेवे हे ज्या दिनांकापासून पदभार स्विकारतील त्या दिनांकापासून ते पहिली दोन वर्ष परिविक्षा कालावधीवर राहतील. सदरचा परिविक्षा कालावधी संपल्यानंतर पहिली वेतनवाढ त्यांना देय आहे. तथापि, नंतरच्या वेतनवाढी मात्र परिविक्षा कालावधी पूर्ण झाल्यानंतर देय राहतील. श्री.धीरज नागदेवे यांचे परिविक्षा कालावधीतील वेतन शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार निश्चित करण्यात यावे. परिविक्षा कालावधीमध्ये त्यांच्या कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास आणि विहित वेळेत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास आणि अशा तऱ्हेने त्यांचे काम व वर्तणुक आयोग्य आढळल्यास ते सेवेतून कमी करण्यास पात्र ठरतील.

३) श्री.धीरज नागदेवे यांना सेवेचा/पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांना कमीत कमी एक महिन्याची पुर्वसुचना शासनास दिली पाहिजे तसेच त्यांना सेवेतून कमी करावयाचे झाल्यास शासन एक महिन्याची पुर्व सुचना त्यांना देईल. तथापि, त्यांच्या सेवेच्या कालावधीत दुर्वर्तन झाल्यास वा शासन सेवाशर्तीचा त्यांनी भंग केल्यास पुर्वसुचनेचा कालावधीही विचारात न घेता त्यांना शासन सेवेतून कमी करण्यात येईल.

४) श्री.धीरज शेषराव नागदेवे यांना सदर पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल, तर त्यांनी कमीत कमी १ महिन्याची पूर्वसूचना शासनास दिली पाहिजे. तसेच त्यांना सेवेतून कमी करावयाचे झाल्यास शासन १ महिन्याची पूर्वसूचना त्यांना देईल. तथापि, त्यांच्या सेवेच्या कालावधीत दुवर्तन वा शासकीय सेवाशर्तीचा त्यांनी भंग केल्यास पूर्वसूचनेचा कालावधी विचारात न घेता, त्यांना शासकीय सेवेतून कमी करण्यात येईल.

५) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०९.०१.२००९ रोजीच्या शासन निर्णयात नमुद केल्यानुसार पोलीस विभागाकडून चारित्र्य व पुर्व चारित्र्य पडताळणी अहवाल त्या पदावर रुजू झाल्याच्या सहा महिन्याच्या आत शासनास सादर करण्याच्या अधिन राहून सदरची नियुक्ती देण्यात येत आहे.

६) सहाय्यक व्यवस्थापक (गट-ब) या पदाचे सेवाप्रवेश नियम दिनांक २७.०२.१९८१ च्या अधिसुचनेअन्वये निश्चित करण्यात आले असून त्यानुसार,

१. सहाय्यक व्यवस्थापक (गट-ब) या पदाचा परिविक्षा कालावधी दोन वर्षांचा असेल.

२. सदर पदासाठी विहित केलेली विभागीय परिक्षा आणि हिंदी व मराठी भाषा परिक्षा जर ती व्यक्ती सदर परिक्षा उत्तीर्ण झाली नसेल, त्या परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर या बाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

३. सदर उमेदवाराची नियुक्ती ही सेवाप्रवेशनुसार असून, त्यात नमुद केल्यानुसार त्यांची सेवा राज्यामध्ये कोणत्याही ठिकाणी बदलीस पात्र असेल.

७) श्री.धीरज शेषराव नागदेवे हे या नियुक्तीपूर्वी पासून शासन सेवेत असल्याने त्यांच्या पूर्वीच्या सेवा जोडून देणे, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्याबाबतचे आदेश वेगळ्याने/यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

८) श्री. नागदेवे यांच्या चारित्र्य पडताळणी तपासणी, जात वैधता प्रमाणपत्रांची पडताळणी, वैद्यकीय तपासणी व प्रमाणपत्रांची तांत्रिक पडताळणीचा अहवाल संबंधित यंत्रणेकडून मागविण्यात येईल व सदर अहवालाच्या अधीन राहून श्री.धीरज नागदेवे यांना सदर नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

९) सदरचा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२४०३१५२०५४४४९०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LAXMIKANT GOPALRAO DHOKE

Digitally signed by LAXMIKANT GOPALRAO DHOKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=413beeca50b65438c7a037917ccf1f24d8ca684b65640df6372ea731ffac4dfc, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E714BBCD4D43C6782884C7E7A2091F9F1EDC1D97EBB542C48B98FB8C8BDD6CF4, cn=LAXMIKANT GOPALRAO DHOKE
Date: 2024.03.15 21:04:20 +05'30'

(लक्ष्मीकांत ढोके)

सह सचिव (उद्योग व खनिकर्म), महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई.

२. व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.
३. प्रभारी उप व्यवस्थापक, शासकीय कारागृह मुद्रणालय, नागपूर.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर.
५. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर.
६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने).
७. सह सचिव, उद्योग-४, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (का.१२/का.१६ ब), मंत्रालय, मुंबई.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. श्री.धीरज शेषराव नागदेवे, प्लॉट नं.१३१ अ, गुरुनानकपुरा, कमल टॉकीज रोड, नागपूर-४४० ०१७.
१२. निवड नस्ती.